**अधिष्ठाता कार्यालय,**

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया**

**ई – निविदा सुचना ( पहीली वेळ ) अटी व शर्ती बदलासह**

**फेर निविदा**

**( कंत्राटी सफाई कामगारांची सेवा पूरवीण्यासाठी )**

**ई – निविदा सुचना क्रमांक/ /२०१७-१८ दिनांक :- /१०/२०१७**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय गोंदिया अंतर्गत गोंदिया येथे६१ कंत्राटी सफाई कामगारांची आवश्यकता आहे ( कंत्राटी सफाई कामगारांच्या संख्येत आवश्यकतेनुसार वाढ अथवा घट होवू शकते). कंत्राटाचा कालावधी करारनामा झाल्यापासून ११ ( अकरा ) महिन्यासाठी राहील. त्यासाठी सफाई कामगार सेवा पुरविण्याकरीता नोंदणीकृत कामगार पुरवठा संस्था/कंत्राटदाराकडून ई-निविदा ( दोन पाकीट ) पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा विक्री रक्कम | अनामत रक्कम | कामपूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय गोंदिया अंतर्गत६१ कंत्राटी कामगार ११ महिण्याच्या कालावधीकरीता (कंत्राटी पध्दतीने)** | १,०००/- | २५०००/- | ११ महिणे |

१) वरिल कामाची निविदा प्रक्रिया संगणकावर ई-निविदा प्रक्रियेव्दारे ऑन लाईन करण्यात येईल या निविदा संबंधित या पुढील सर्व सुचना/शुध्दीपत्रके इ. इंटरनेटच्या उपयोगाने ऑनलाईन करण्यात येतील.

२) निविदेतिल अटी व शर्ती तसेच निविदा फार्मचा नमूना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया च्या www.gmcgondiya.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दिनांक १९.१०.२०१७ रोजी सकाळी १० पासून ते दिं २६.१०.२०१७ दुपारी ०२:०० वाजे पर्यंत पाहता येईल व डाऊनलोड करता येईल.

३) वरील निवीदा आवश्यक सर्व कागदपत्रासह प्रपत्र- अ मध्ये www.gmcgondiya.in या संकेत स्थळावर दिं.१९.१०.२०१७ रोजी सकाळी ११:०० पासून ते दि. ०९.११.२०१७ दुपारी २:०० वाजे पर्यंत भरता येईल.

४) निविदा फार्म दिं.१९.१०.२०१७ फी रक्कम रु. १०००/- व बयाणा रक्कम रुपये .२५०००/- या रक्कमाचे भरणा अधिष्ठाता, कार्यालय रोखपाल विभागात डि. डि. व्दारे भरण्यात यावे Dean, Govt. Medical College, Gondiya या नावे डि. डि. देण्यात यावे.

५) लिफाफा क्रं. १ मध्ये स्कॅन करुन सादर केलेल्या सर्व कागदपत्राच्या सत्यप्रती दि. ०९.११.२०१७. रोजी दुपारी ३:०० वाजता अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय गोंदिया यांचे कार्यालयात समक्ष निविदा धारकानी आणून देणे आवश्यक आहे.

६) उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यात कोणतेही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

७) पूर्ण माहिती भरलेले तांत्रिक लिफाफा क्र. १ दि. १०.११.२०१७ रोजी दुपारी ०१ वाजता अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया यांचे कार्यालयात उघडल्या जातील.

८) पात्र निविदाधारकास व्दितीय लिफाफा क्रं. २ उघडण्याची वेळ व दिनांक त्यांच्या ई- मेल पत्यावर कळविण्यात येईल.

९) कोणतेही कारण न देता निविदा रदद् अथवा नाकारणाचा अधिकार अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया यांनी राखुन ठेवण्यात आलेला आहे.

कंत्राटी पध्दतीने सफाई कामगारांची सेवा पुरविण्यासाठी अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया येथे ई- निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यासाठी सर्व पुरवठादार/संस्था यांना सुचित करण्यात येत की ज्या संस्था पुरवाठादार सदर निविदा भरण्यास इच्छुक आहेत. त्यांना सर्वप्रथम www.gmcgondiya.inया संकत स्थळावर पंजीकृत करणे अनिवार्य राहील. तसेच ई-निविदा प्रक्रियेसाठी ई- टोकन ( Digital Signature ) सुध्दा अनिवार्य राहील.

प्रशासकीय अधिकारी
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
गोंदिया

मा. अधिष्ठाता
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,**
**गोंदिया**

## कंत्राटी सफाई कामगार सेवा निविदेच्या अटि व शर्ती

१. या कामाबाबतची ई- निविदा रुपये १०००/- ईतक्या रक्कमेची डि. डि. ऑनलाईन उपलब्ध करावा व अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया या कार्यालयात जमा करावा.

२. सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्राकडे नोंदणीकृत संस्था असल्याचे चालू वर्षाची प्रमाणपत्राची प्रत जोडणे बंधनकारक राहील.

३. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया ला पुरविलेल्या सेवेच्या मोबदल्यात प्रदान करावयाचे मानधनाचे शोधन करण्याकरीता आवश्यक निधी शासनाकडून प्राप्त होण्यास विलंब झाल्यास सफाई कामगारांना मानधन देण्याची सर्व जबाबदारी कंत्राट दारा ची राहिल.

४. संस्थेने सफाई कामगारांना मानधन अदा केल्यानंतर त्याची पोचपावती दरमहा सादर करावी व कमी मानधन दिला जाणार नाही याची जबाबदारी पुरवठाधारक संस्थेची राहील. सफाई कामगारास दयावयाचा मानधन पुरवठादार संस्थेने बँके मार्फत अदा करावे

५. निविदा करार निविदा स्विकारल्याचे तारखेपासून अकरा महिन्याच्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहील व आवश्यकता वाटल्यास पुढे मुदतवाढ देण्यात येईल.

६. ई- निविदा उघडल्यापासुन ९० दिवसापर्यंत विधीग्राहय राहील.

७. पुरवठादार संस्था/ कंत्राटदार यांचेकडून कोणत्याही शर्ती व अटीसह सादर केलेली ई- निविदा स्विकारल्या जाणार नाही.

८. नियमाप्रमाणे लागु असलेल्या कराची रक्कम देयकातून कपात करण्यात येईल.

९. ई- निविदा दोन लिफाफा पध्दतीमध्ये स्विकारण्यात येतील.

१०. लिफाफा कं. १ मध्ये सादर करावयाची सर्व कागदपत्रे राजपत्रीत अधिकारी/ ईतर सक्षम अधिकारी यांचेकडून साक्षांकन केलेले असावेत.

११. दि. ०९.११.२०१७ ला दु. २:०० वा. चे दुपार नंतर हस्तांतरित किंवा रजिस्टर टपाल वितरणाव्दारे अथवा इतर कोणत्याही पध्दतीने निविदा स्विकारले जाणार नाही.

१२. को-या निविदेची किंमत रु. १०००/- ( ना परतावा ) राहील व अनामत रक्कम रु. २५,०००/- भरल्याची डि. डि. असणे आवश्यक आहे. या करीता कोणत्याही प्रकारची सुट देण्यात येणार नाही.

१३. ज्या निविदा धारकाची निविदा मंजूर केल्या जाईल त्या निविदा धारकास रु. २५,०००/- इतकी रक्कम सुरक्षानिधी म्हणून जमा करावी लागेल.

१४. निविदा सादर करण्याचा कालावधी संपण्याच्या दिवशी विहित केलेल्या वेळेच्या साधारणतः १ तास पुर्वी किमान ३ निविदा प्राप्त झाल्या नाहित तर निविदा प्रक्रियेस ७ दिवसाची मुदतवाढ देण्यात येईल.

१५. मंजुर निविदा धारक संस्थेने पुरविण्यात येणा-या सफाई कामगारांचा पि. एफ. ( प्रॉव्हीडंट फंड ) काढलेला असणे आवश्यक आहे.

१६. संस्थेमार्फत काम करणा-या कंत्राटी सफाई कामगारांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही. सदर सेवा ही कंत्राटी असल्याने कंत्राटी सफाई कामगारांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या सेवेत सामावून घेण्याबाबत कोणताही हक्क राहणार नाही. तसेच न्यायालयात दाद मागता येणार नाही. व न्यायालयीन हक्क प्रस्थापित करता येणार नाही. न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास कंत्राटदार स्वतः जबाबदार राहतील.

१७. कामगार कायदे आणि त्यासंबधी शासन निर्णय यांच्या चौकटीत राहुनच कामे करावीत. आणि त्यामध्ये उल्लघंन केल्यास, कत्राटदार हे स्वतःजवाबदार राहतील. तसेच कंत्राटी सफाई कामगार यांचे मानधन/ पी पी एफ फंड व ईतरबाबतीत कंत्राटदार हे स्वतः जवाबदार राहतील.

१८. निविदा मंजुर झालेल्या संस्थेने पुरविण्यात येणा-या कंत्राटी सफाई कामगारांचे वैदयकिय दुष्टया सक्षम असल्याचे वैद्यकीय अधिकारी/ जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

१९. वरिल सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु १००/- चे स्टॅम्प पेपरबर करारनामा करुण देणे आवश्यक राहील.

२०. ई- निविदेतील अटी व शर्तीमध्ये बदल अथवा शिथील करण्याचा अधिकर मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

२१. कोणतेही कारण न दाखविता ई- निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

## लिफाफा क्रं. १ मध्ये खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१. निविदा कालावधि करीता कंत्राटी सफाई कामगार सेवा पुरविण्यासाठी निविदेत नमुद केलेल्या दराप्रमाणे एकूण रु. २५०००/- अनामत रक्कम व निविदा फार्म रक्कम रु. १,०००/- इंटरनेट बँकींगव्दारे ऑनलाईन भरल्याची स्लीप जोडणे आवश्यक राहील.
२. पॅनकार्डची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
३. संस्थेची नोंदणी बाबतचे प्रमाणपत्राची सत्यप्रत.
४. किमान ०२ वर्षाचे सफाई कामगार सेवासुविधा पुरविल्याचा शासकीय संस्थेच्या कामाचा अनुभवाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.
५. सदरची मनुष्यबळ पुरवठा करणारी संस्था शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळ्या यादीत टाकलेली नाही याबाबतचे संस्था प्रमुखाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
६. संस्थेचे पि. एफ. ( प्रॉव्हीडंट फंड ) नोंदनीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
७. सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र
८. आयकर सन २०१५-१६, सन २०१६-१७ सन २०१७-१८ भरल्याबाबतचे रिटर्नची प्रत आवश्यक राहील.
९. संस्थेचे लेटरपॅडवर अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
१०. जि एस टी सर्टीफीकेट जोडणे आवश्यक.
११. ज्या संस्थाना कार्यक्षेत्र उपविधी मध्ये गोंदिया तालुका राहील अशा संस्थाना प्राधान्य देण्यात येईल.
१२. मा. संचालक सहाय्यक रोजगार स्वयंरोजगार मार्ग दर्शक केंद्र गोंदिया यांचे कडुन सफाई संस्था नोंदणीकृत असलेले प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

लिफाफा क्रमांक - २

मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया यांचे कार्यालया कडून www.gmcgondiya.in या संकेत स्थळावर ऑनलाईन उपलब्ध असलेल्या Excell Sheet ( प्रपत्र - ब ) मध्ये प्रती महिना प्रती सफाई कामगार मानधन ( रुपये /- ) दर नमुद करण्यात यावे.

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया**

१. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया येथे सफाई कामगारांची सेवा दिवसातून तीन वेळा द्यावी लागेल. नियमित साफ सफाई करणे, सर्व वार्डांची, साफ सफाई, लेबर रुम, ओ. टी. संडास बाथरुम दिवसातून तिन वेळा स्वच्छ करणे, सर्व खिडक्या तावदाने, पंख्यासह ट्युब, सिलिंग फॅन यांची नियमीत सफाई, जळमटे काढणे तथा रुग्णालय प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेली सफाई विषयक इतर सर्व कामे.
२. सफाई कामगार हे वैद्यकियदृष्ट्या पात्र असावेत.
३. सफाई कामगार हा कंत्राटव्दारा मार्फत उपलब्ध होणार आहे. त्यामूळे उपलब्ध करुन देण्यात येणा-या सफाई कामगारांची वैद्यकीय अधिकारी/ जिल्हा शल्य चिकित्सक करतील.
४. कामावर असतांना सफाई कामगारांनी गणवेष परिधान करणे व गणवेषाला ओळखपत्र लावणे अनिवार्य राहील.
५. नियुक्त करण्यात आलेल्या सफाई कामगारांना मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया यांच्या परवानगीशिवाय बदलण्यात येऊ नये.

**खालील नमुद बाबी पुरविण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील**

१. सफाई कामगारांना गणवेष कार्यालयाकडून ठेकेदारांना पुरविण्यात येणा-या सेवा सुविधी
२. कंत्राटी कामगारांना ओळखपत्र सफाई कामगार सेवेचे सनियंत्रण :-

खालील सदस्यांची समिती सफाई कामगार सेवेची गुणवत्ता पडताळणी दरमहा करेल.

१. साफ सफाई चे सामान देण्याची जबाबदारी कंत्राट दाराची राहील.
२. मा. अधिष्ठाता, यांची समिती २. ठेकेदाराचे प्रतिनिधी

कंत्राटदाराच्या/ कंत्राटी कर्मच्या-याचे असमानकारक सेवेबाबत समज देण्यात येईल व कामात सुधारणा न दिसून आल्यास दंड आकारण्यात येईल. कंत्राटदाराच्या सेवा मार्गदर्शन सुचनांच्या अनुषंगाने न आढळल्यास त्या कुठल्याही क्षणी रदद् करण्याची शिफारस मा. अधिष्ठाता यांचेकडे करतील. अशा परिस्थितीत कंत्राटदाराने भरलेली हमी रक्कम जप्त करण्यात येईल.

निविदा मंजूर झाल्यानंतर करारनामा वेगळा भरावा लागेल तसेच करारासोबत १० टक्के रक्कमेचे एक वर्ष कालावधीचे बँकेची हमीपत्र प्राप्त झाल्यानंतर अनामत रक्मेचा ड्राफ्ट परत करण्यात येईल. प्राप्त झालेल्या निवीदांपैकी कोणतीही निविदा काही कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया राखून ठेवण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| प्रशासकीय अधिकारी | मा. अधिष्ठाता |
| शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया |

प्रपत्र - अ

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया करीता सफाई कामगार ( कंत्राटी पध्दतीने ) पुरविणेबाबत ई- निवीदा फार्म ( लिफाफा क्रं. १ )

तांत्रिक माहीती

| अ. क्रं. | लिफाफा क्रं. १ मध्ये मागविण्यात आलेली माहिती | कंत्राटदाराकडून पुरविण्यात आलेली माहिती |
|---|---|---|
| १ | संस्थेचे अमानत रक्कम रु. २५,०००/- व निविदा फार्म रु. १०००/- भरल्याची पावती. | |
| २ | पॅनकार्डची सत्यप्रत. | |
| ३ | संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र. | |
| ४ | सदर संस्था कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत नसल्याबाबतचे संस्था प्रमुखाचे प्रमाणपत्र. | |
| ५ | संस्थेचे पि. एफ. ( प्रोव्हीडेंट फंड ) नोंदणीचे प्रमाणपत्र. | |
| ६ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र/ सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये व्यवसाय कर भरल्याचे प्रमाणपत्र. | |
| ७ | जि.एस. टी. नोदणी प्रमाणपत्र. | |
| ८ | आयकर २०१५-१६, २०१६-१७ भरल्याबाबतचे रिटर्नची प्रत. | |
| ९ | संस्थेचे लेटरपॅडवर अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र | |
| १० | किमान दोन वर्षाचे सेवा पुरविल्याचा शासकीय संस्थेच्या कामाचे अनुभवाचे प्रमाणप्रत्र | |
| ११ | भविष्य निर्वाह निधी बाबतचे नोंदनीप्रमाणपत्र | |

प्रमाणीत करण्यात येते की, वर नमुद केलेली माहिती खरी आहे. सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकिचा आढळल्यास आमच्या संस्थेची निविदा अपात्र ठरविण्यात येवून रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निविदा समितीस आहेत याची मला जाणीव आहे.

निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का

प्रपत्र - ब

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया**

फेर निविदा क्रमांक .....................

किंमत रुपये १०००/- ( नापरतावा )

निविदा फार्म

निविदा सादर करणा-या संस्थेचे नाव:-....................................................................................................................

....................................................................................................

पत्ता :-....................................................................................................................

....................................................................................................

दुरध्वनी क्रमांक :-....................................................................................................

निविदा धारकाचे नाव :-................................................................................................

पत्ता :-....................................................................................................................

....................................................................................................

दुरध्वनी क्रमांक :-....................................................................................................................

....................................................................................................

प्रति एक सफाई कामगारासाठी प्रतिमहा आकारण्यात येणारे दर

| प्रति एक सफाई कामगार | प्रतिमाह दर |
|---|---|
| | |

दिनांक :-

मोहर :-

स्वाक्षरी

निविदा धारकाचे नाव